बीड ।जालना। छत्रपती संभाजीनगर । पुणे । अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → गुरुवार दि २७ ऑगस्ट २०२६ → वर्ष १० वे → अंक -१३० → पाने ४ → किंमत २ रु

Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Thusday Date: 27 August 2026 → 10 th Year → 04 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक

# लोकनायक

संपादक - भारत गायकवाड

# ओय राजु पाटोदा शहरातील शिक्षक शिक्षिका वर भरोसा नाय काय ?

**पाटोदा शहरातील शिक्षणाची अत्यंत दुरावस्था झाली असुन महिनाकाठी सरकार शिक्षक शिक्षिका प्राध्यापकांच्या पगारावर साडे आठ कोटीच्या वर शिक्षकांवर खर्च करते तरीही पाटोदा शहरात खाजगी क्लास चालु आहेत विशेष म्हणजे जे पगारी शिक्षक प्राध्यापक आहेत तेच खाजगी शिकवणी घेत आहेत.. म्हणुनच म्हटले जाते..ओय राजु तुझा पाटोदा शहरातील शिक्षकांवर भरोसा नाय काय? शाळेत शिकवले का जात नाही हे विचारणारा एखादा पालक जिवंत आहे काय?**

## पाटोदा शहरातील एकतरी पालक जिवंत आहे काय?

**लोकनायक वृत्तसेवा –** संपुर्ण देशात महागाई गगणाला भिडली बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध नाही.. संसाराचे बजेट कोसळले आहे त्यातच शिक्षणाची ही दुरावस्था झाली आहे.कॉक्रोज जनता पार्टी व विविध सामाजिक संघटनांनी शिक्षणाविषयी व दुरावस्थाविषयी आंदोलन चालु केले आहे.मात्र पाटोदा शहरात एकुण आकरा प्राथमिक शाळा,आठ माध्यमिक विद्यालय,तीन वरिष्ठ महाविद्यालय,तीन उर्दू शाळा आहेत.या शाळेत किंवा महाविद्यालयात कोणताही क्लास शिक्षक शिक्षिका प्राध्यापक यांनी कधीही गांभीर्याने घेतला नाही.या विद्यालयात व महाविद्यालयात फक्त प्रवेश घेऊन विद्यार्थी फक्त प्रात्यक्षिके व परिक्षालाच येतात एवढच नव्हे तर काही विद्यार्थ्यांचे सर्व पेपरही लिहुन घेतले जातात.या महाविद्यालयात किंवा विद्यालयात पाल्यांचा प्रवेश असताना एकाही पालकांचा येथिल शिक्षकांवर किंवा प्राध्यापकांच्या **पान २ वर**

पान २ वर

### उपजत कलागुणांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम आयोजित नाही.

कोणत्याही महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या उपजत कलागुणांना व खेळाडु वृतीला प्रोत्साहन देणारे कोणतेही कार्यक्रम घेतले जात नाहीत.विषय शिक्षक शिक्षिका किंवा प्राध्यापक यांकडे गांभीर्याने पाहात नाहीत.शिक्षणाविषयी योगदान देणारे शिक्षक शिक्षिका

### भौतिक सुविधा नाहीत..

पाटोदा शहरातील खाजगी क्लासेस वाले हे भरमसाठ फिस आकारीत असुन कोणत्याही खाजगी क्लासेस मध्ये भौतिक सुविधा नाहीत.एका एका क्लासेस मध्ये ९०च्या घरात दाटीवाटीने विद्यार्थी बसवले जात आहेत.

### शाळा महाविद्यालय क्लास होत नाहीत ही खंत

पाटोदा शहरात एके काळी एकही खाजगी क्लास नव्हता.शिक्षक शिक्षिका प्रमाणिकपणे काम करत होते.परंतु पाटोदा शहरातील शिक्षक शिक्षिका प्राध्यापक हे लाखांच्या घरात पगार घेऊन शाळा

# विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी मोलाचा ठेवा

## ॲड. कृष्णराव सयाजीराव पंडित सर यांच्याकडून विधी महाविद्यालयाला कायदेशीर ग्रंथांची देणगी

**लोकनायक वृत्तसेवा –** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सेनानी रामराव आवारगावकर विधी महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी बीड जिल्हा व सत्र न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कृष्णराव सयाजीराव पंडित सर यांनी विविध विषयांवरील अत्यंत दुमिळ आणि महत्त्वपूर्ण विधीविषयक ग्रंथ व जर्नल्सची देणगी दिली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी ही ग्रंथभेट कृतज्ञतापूर्वक स्वीकारली. या देणगीमध्ये क्राइम्स (उीळाशी), ऑल महाराष्ट्र सुप्रीम कोर्ट केसेस रिपोर्टर, बॉम्बे केसेस रिपोर्टर, सुप्रीम अपील्स रिपोर्टर, सुप्रीम कोर्ट क्रिमिनल डायजेस्ट



यांसारख्या नामांकित संदर्भ ग्रंथांच्या खंड आणि जर्नल्सचा समावेश आहे. या प्रसंगी बोलताना **पान २ वर**

पान २ वर















loknayak 27.08.2026 - Copy:Copy of Layout 1 8/26/2026 11:55 PM Page 2



# बजरंग सोनवणे यांच्या विरोधातील केज येथील बेमुदत आमरण उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरूच!

## खासदार यांच्यावर जोपर्यंत प्रशासन ठोस कारवाई करत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार-शरद धिवार

**लोकनायक वृत्तसेवा –** स्वांतंत्र्य दिनाच्या दिवशी खा.बजरंग सोनवणे यांनी येडेश्वरी कारखाना येथे ध्वज-ारोहण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो न ठेवता फक्त गांधीचा फोटो ठेवुन ध्वजारोहन केले. खा. बजरंग सोनवणे यांनी ही घटना अनावधानाने नाही तर जाणुनबुजून केल्याचा आरोप उपोषणकर्ते वंचितचे शरद धिवार यांनी केला असून या बाबत प्रशासनाने याची दखल घेवून त्यांचेवर कार्यवाही करावी या मागणीसाठी ते केज तहसील कार्यालयाच्या समोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले असून हे उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरूच असून

खा. बजरंग सोनवणे यांच्यावर जोपर्यंत प्रशासन ठोस कारवाई करत नाही. तोपर्यंत अमरण उपोषण सुरूच ठेवणार असल्याच्या निर्णयावर शरद धिवार हे ठाम आहेत.तर वंचितचे शरद धिवार यांच्या बेमुदत आमरण उपोषणाला जिल्ह्यातून वाढता पाठिंबा मिळत आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी साखर कारखाना येथे दिनांक १५ ऑगस्ट२०२६ रोजी स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमांमध्ये खासदार बजरंग सोनवणे यांनी भारतरत्न संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो (प्रतिमा) न ठेवता ध्वजारोहन केले.खा. बजरंग सोनवणे यांनी जाणून-बुजून केलेली नवी खिळी असून याप्रकरणी खासदार यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा. या प्रमुख मागणीसाठी वंचितचे शरद धिवार यांनी

दिनांक २० ऑगस्ट २०२६ पासून केज तहसील कार्यालयाच्या समोर अमरण उपोषण सुरू केले असून हे उपोषण गेल्या दोन दिवसांपासून सुरू असुन त्यांच्या उपोषणाला सर्व स्तरातून वाढता पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. यांनास्वातंत्र्यदिनी दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा(फोटो) न ठेवणे म्हणजे खासदार बजरंग सोनवणे यांनी जाणून बुजून केलेली ही नवी खेळी असून या प्रकरणी खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर तात्काळ ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच खासदार बजरंग सोन-वणे यांनी यापूर्वी येडेश्वरी कारखाना येथेच २६ जानेव-ारी २०२६ च्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमातही महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची फोटो प्रतिमा न ठेवताच कार्यक्रम घेतला होता. खासदार सोनवणे हे संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना वारंवार डावलण्याचे काम करत आहेत□ त्यामुळे संबंध देशातील आंबेडकर प्रेमी यांच्या भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी खासदार सोनवणे यांच्या विरुद्ध ॲट्रॉसिटी ॲक्टानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा. येडेश्वरी साखर कारखान्याचा साखर आयुक्त यांनी तात्काळ परवाना रद्द करण्यात यावा.यासह इतर मागण्यासाठी व या प्रकरणाची माहिती ही राज्याचे सहकार मंत्री व साखर आयुक्त यांच्यासह संबंधित कार्यालयांना अवगत करण्यात यावे असे निवेदनात शरद धिवार यांनी नमूद केले होते. त्यांच्या या मागणीची केज तहसीलदार यांनी दखल घ ` ऊ न क्रं.२०२६/एमएजी/कावि/६०८ दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी प्रादेशिक सहसंचालक,(साखर) छत्रपती संभाजीनगर यांना पत्र देऊन कळवले होते. तसेच सदरील पत्र हे जिल्हा दंडाधिकारी बीड, उपविभागीय दंडाधिकारी आंबेजोगाई, चेअरमन येडेश्वरी सहकारी साखर कारखाना सारणी(आ.) यांना दिले होते. सदरील पत्रात केज तहसीलदार यांनी वंचित बहुजन आघाडीचे शरद धिवार यांच्या मागण्याचा उल्लेख केला होता व ते २५ ऑगस्ट २०२६ रोजी केज तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत त्यांना आमरण उपो-षणाच्या मार्गापासून परावृत्त करावे. असे नमूद केले होते. परंतु येडेश्वरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व प्रादेशिक संचालक,(साखर) छत्रपती संभाजी नगर यांनी कार्यवाही केली नाही. व उपोषण कर्ते शरद धिवार यांना कसल्याच प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही. अथवा त्यांना आमरण उपो-षणापासून परावृत्त केले नाही. म्हणून दिनांक २५ ऑगस्ट २०२६ रोजी पासून वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसले आहेत. उपोषणाच्या दुसरीही दिवशी संबंधित कार्यालयाचे अधिकारी अथवा कर्मचारी यांनी उपोषण स्थळी उपो-षणकर्त्यांना भेट दिली नाही अथवा भेट घेतली नाही.

### वंचितचे शरद धिवार यांच्या आमरण उपोषणाला जिल्ह्यातून वाढता पाठिंबा

**या आंदोलनाची दिवसाने दिवस अधिक तीव्रता वाढत असून बीड जिल्ह्यातून वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते उपोषणास भेट देण्यासाठी व पाठिंबा दर्शविण्यासाठी येत आहेत. आणि येणार आहेत. परळी येथील वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते यांनी केज येथील तहसील कार्यालयासमोर वंचितचे शरद धिवार यांच्यासह आमच्या सर्व सहकाऱ्यांचे सुरू असलेल्या आमरण उपोषणास भेट देऊन उपोषणकर्ते शरद धिवार यांची व आमच्या सर्व सहकार्या समवेत चर्चा करून उपोषणाला त्यांनी पाठिंबा दिला आहे. जर प्रशासनाने शरद धिवार यांच्या उपोषणाची तात्काळ दखल घेतली नाही. तर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने संपूर्ण बीड जिल्ह्यात तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचे ठरवले आहे याबाबतची माहिती आम्ही आमच्या वरिष्ठांना कळवून वरिष्ठच्या आदेशावरून संपूर्ण जिल्ह्यातील आंदोलनाची दिशा लवकरच जाहिर करणार आहोत असे चर्चा दरम्यान वंचितचे कार्यकर्ते प्रवीण मस्के यांनी सांगितले आहे.**

य ा देशाला संपूर्ण स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सविधान निर्माते महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी२ वर्षे ११ महिने१८ दिवस अहोरात्र कष्ट करून अथक परिश्रम घेऊन संपूर्ण जगाला मार्ग, दिशा दाखवणारी व देशाला

एकसंघ ठेवणारी राज्यघटना या देशाला अर्पण करून भारत देश प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी स्वातंत्र्यानंतर आजही महामानव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धोरणात्मक विचारांचा, कृषी धोरणाचा, दूरदृष्टीचा, जनसमायोजनाचा अर्थ निधीचा आधार घ्यावा लागतो. आज रोजी संपूर्ण भारत देश हा स्वाभिमानाने उभा असून या देशातील सर्व नागरिक खेळ स्वाभिमानाने व ताट मानाने आपले जीवन जगत आहेत व सर्वांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे स्वालंबित जीवन जगण्याचा अधिकार मिळाला आहे. खासदार बजरंग सोनवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळेच खासदार झाल आहेत. व त्यांना दलितांची मते जमतात परंतु खासदार सोनवणे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर का जमत नाहीत.असा सवाल वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

जोपर्यंत खासदार बजरंग सोनवणे यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्ट अनुसार गुन्हा दाखल होत नाही.

तोपर्यंत मी माझे उपोषण मागे घेणार नाही या निर्णयावर उपोषण कर्ते शरद धिवार यांनी ठाम असल्याचे सांगितले.

---

## पान १ वरून

**ओय**

**राजु पाटोदा शहरातील शिक्षक शिक्षिका वर भरोसा नाय काय?**

..

शिकवण्यावर भरोसा नसल्याने त्यांनी खाजगी क्लासेसला प्राधान्य दिले आहे.पाटोदा शहरात एकुण पंधरा खाजगी क्लासेस कोणत्याही भौतिक सुविधा विना भरमसाठ फिस घेऊन चालतात.तर काही क्लासेस हे ट्रस्टच्या देविच्या मंदिरात चालतात.विशेष म्हणजे हेच खाजगी क्लासेस सरकारचा पगार घेणारे शिक्षकांचे आहेत.ही दुरावस्था पहायला मिळते मात्र एकही पालक कोणत्याही शिक्षण प्रशासनाना विचारत नाही.ही मोठी शोकांतिका आहे.पाटोदा शहरातील बहुतांश शिक्षक व प्राध्यापक हे बीडलाच राहतात.हे सर्व स्वतः च्या चारचाकी वाहनातुन केवळ पर्यटक म्हणुन पाटोदा शहरात येतात थातुर मातुर काम केल्याचा आव आणून दिवसभर मोबाईल मध्ये डोकं घालुन असतात असे काही विद्यार्थ्यांनी बोलताना सांगितले.या सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारावर साडे आठ कोटींच्या वर खर्च करत आहे.

**विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी ..**

प्राचार्य डॉ. शेख अनिसूर रहमान सर म्हणाले की, 'ॲड. कृष्णराव पंडित सर यांनी दिलेला हा अनमोल ग्रंथसंग्रह विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी तसेच प्राध्यापकांसाठी सखोल कायदेशीर अभ्यास, केस लॉ विश्लेषण आणि 'मूट कोर्ट'च्या तयारीसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. विधी शिक्षणाच्या गुणवत्तेत भर घालणारे हे योगदान नक्कीच मार्गदर्शक व कौतुकास्पद आहे.'

या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने ॲड. कृष्णराव पंडित सर यांना अधिकृत आभारपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला व मनस्वी ऋण व्यक्त करण्यात आले त्यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. एन. एन.साबळे सर , प्राध्यापक सुनील हराळे व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी व विधी क्षेत्रातून ॲड. कृष्णराव सयाजीराव पंडित सर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

---

# दुष्काळाच्या उंबरठ्यावर जिल्हाधिकारी कार्यालयात पाण्याची नासाडी

## लिकेज बंद करून पाणी वाचवा - एस.एम.युसूफ़

**लोकनायक वृत्तसेवा –** यावर्षी पर्जन्यमानाचे तीन महिने संपत आले, तरीही अजून पर्यंत दमदार पाऊस पडलेला नाही. एकंदरीत वातावरण दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभे आहे. अशा परिस्थितीत बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात पाण्याची नासाडी होत आहे. याकडे मात्र कार्यालयातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचेही दुर्लक्ष असल्याने लाख मोलाचे पाणी वाया जात आहे. याकडे संबंधितांनी लक्ष द्यावे. वाया जाणारे पाणी वा-चवावे अशी कळकळीची विनंती मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, यावर्षी पावसाळ्याचे तीन महिने संपत आले तरीही हवा तेवढा दमदार पाऊस अजून पर्यंत पडलेला नाही. यामुळे नद्या कोरडे ठाक असून जमिनीतील पाण्याचे प्रमाण ही दिवसेंदिवस कमी होत चालल्याने विहिरी आणि बोअर्स चे पाणी आटत चालले आहे. अशा स्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या दालना समोरच घेतलेल्या झेंड्याच्या चबुर्तयासमोरील बोअरचे पाणी कार्यालय आणि झाडांना देण्यासाठी वापरण्यात येते. याकरिता केलेली पाईपलाईन लिकेज झालेली आहे. त्यातून सतत पाण्याचे कारंजे उडून चबुतऱ्यासह सगळीकडे पसरत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे. हे लिकेज काढल्यास पाण्याची नासाडी थांबेल, लाख मोलाचे पाणी वाया जाणार नाही.



याकडे जिल्हाधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लक्ष देऊन लिकेज बंद करावे आणि होणारी पाण्याची नासाडी थांबवावी. अशी कळकळीची विनंती मुक्त पत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

---

## पान ४ वरून

**समर्थ**

**राजयोगचे राज्यस्तरीय ....**

बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महांडुळा तालुका गेवराई अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय गेवराईचे मुख्याध्यापक रवींद्र शंकरराव अरबाड, जनार्दन शिक्षण प्रसारक मंडळ येळंबघाट अंतर्गत मूकबधिर निवासी विद्यालय माजलगावचे मुख्याध्यापक अशोक महालिंग थळपती, उत्कर्ष सेवाभावी संस्था तागडगाव तालुका शिरूर कासार अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय शिरूर कासारचे विशेष शिक्षक रुपेश नथुजी भोजापुरे, बाबासाहेब परांजपे प्रतिष्ठान अंबाजोगाई अंतर्गत कर्तव्य मतिमंद मुलींचे निवासी विद्यालय अंबाजोगाईच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता श्रीरंगराव चौधरी, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान अंबाजोगाई अंतर्गत बोधवर्धिनी मतिमंद निवासी विद्यालय आंबेजो-गाईचे विशेष शिक्षक उद्धव रामराव कदम,छत्रपती शाहू महाराज अपंग पुनर्वसन संस्था आष्टी अंतर्गत छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालय आष्टीचे शिक्षक शरद चंद्रकांत तळेकर, ग्रामीण विकास महिला व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाथापूर तालुका जिल्हा बीड अंतर्गत साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय नाथापूरचे मुख्याध्यापक अशोक अंकुशराव चव्हाण यांना पुरस्कार जाहीर झाला असून या आदर्शवत, गुणवंत शिक्षकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी स्मृतिचिन्ह, सेवा गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, झाड भेट देऊन त्यांना फेटा बांधून सर्वांच्या उपस्थितीत जाहीर राज्यस्तरीय सत्कार करण्यात येणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि कार्यकारी संपादक शेख आयेशा मॅडम यांनी दिली आहे.

**पत्रकार मारहाण प्रकरणात मोठी..**

पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.दरम्यान, पत्रकारांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ पत्रकार संघटना आणि पत्रकार बांधवांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली असून याकडे 'पत्रकार एकजुटीचा विजय' म्हणून पाहिले जात आहे.

**वाळू माफियाचा तहसीलदारांसह महसूल ....**

करण्यात आली. दरम्यान, या गोंधळाचा फायदा घेत ताब्यात घेतलेल्या काही हायवा तहसीलदारांनी कारवाई साठी आणलेल्या क्रुझर गाडीला धडक देत वाळू माफियांनी घटनास्थळावरून हायवा पळवून नेल्या. पाच हायवा व तीन दुचाकी गोंदी पोलिसांनी जप्त केल्या असून एक वाळू उपशाचे फावडे ही ताब्यात घेतले आहे.

या घटनेमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्यांचा मुजोरपणा पुन्हा एकदा समोर आला असून, या प्रकरणी महसूल कडून पंचनामा केला जात असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे. घटना स्थळी गोंदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अमोल गुरले, पोलिस उपनिरीक्षक एस. एम. मुपडे, पोलिस उपनिरीक्षक जंगले यांनी येऊन पाच हायवा व तीन दुचाकी घेऊन गोंदी पोलिस ठाण्यात जप्त केल्या.

**आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून..**

केला जात आहे.

**पाटबंधा-या विभागाच्या जायकवाड्या..**

पहात आसल्याने जायकवाड्यात रिकाम्या आसलेल्या निवास्थानी गाओ गावी झालेल्या वाढत्या लोकसंख्यातील नागरिकांनी गावात व कुटुंबात जागाच उपलब्ध नसल्याने त्या त्या अधिकारी व कर्मचा-यांशी संपर्क साधत तुमच्या नावावर आसलेले जायकवाडीचे निवास आम्हाला रहान्यास द्या अम्ही तुम्हाला महिन्याला ठराविक भाडे देखील देऊ आशी समज घालत गाव पुढा-यांच्या मध्यस्थीने त्या त्या ठिकाणी वास्तव्यास गेले. आज रोजी प्रतेक्षदर्शी ठिक ठिकाणच्या जायकवाड्यात जवळपास कुणी विस वर्षा पासुन ते कुणी तीस तीस वर्षा पासुन वास्तव्यास आहेत. आणी म्हणुन या जायकवाड्यात वास्तव्यास आसलेल्या लोकांनी कुटुंबीयाच्या उपजिवीके कडे प्रथम लक्ष देत दिवसेंदिवस वाढत आसलेल्या वाढत्या महागाईच्या व्यापातुन कुठे स्वताहच्या जागा देखील उपलब्ध करून ठेवल्या नाहीत. आणी आसे आसतांना शासनाने अचानक या जायकवाड्या मोडकळीस आल्याचे इंगीत पुढे करून रिकाम्या करण्याच्या सुचना संबंधितास दिल्या. या मुळे या ठिकाणी वास्तव्यास आस-लेल्या लोकांची फटफजीती लोकप्रतिनिधी नुसती उघड्या डोळ्याने न पहाता या लोकांना बेघर होण्या पासुन वाचवावे किंवा त्यांच्या पुनर्गठनाची व्यवस्था शासन पातळीवर करण्यासाठी कसो-शीने पुढे यावे आशी अर्त हक आता समोर येऊ लागली आहे.

**बाभळगाव च्या उपसरपंचा संशयास्पद मृत्यू ; ....**

घराबाहेर गेले.

ते कुठे चालले याची माहिती त्यांनी त्यांच्या पत्नीस पण दिली नाही त्यानंतर उपरोक्त नमुद केलेल्या वेळी, रस्त्यावरील वळण असलेल्या ठिकाणी वैजनाथ लाटे यांचा मृतदेह व बाजूला त्यांची होंडा शाईन मोटार सायकल आढळून आली.हि वार्ता गावात पसरल्याने घटना स्थळी मोठी गर्दी झाली होती पण दिंद्रुड पोलीसांना माहिति मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांशी योग्य संवाद करून मृतदेह शवविच्छेदन माजलगाव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आला.शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर पार्थिवावर बाभळगावात अंत्यसंस्कार करण्यात आले,वृत्त लिहिपर्यंत कुणीही पोलीसात तक्रार दाखल केली नसल्याची माहिती मिळाली आहे.

वैजनाथ लाटे यांचा पश्चात पत्नी, एक मुलगा ५वर्षे अंदाजे, एक मुलगी ३वर्षेअंदाजे,आई, वडील एक भाऊ एक विवाहित बहिण असा परिवार आहे□.

लोकनायक

गुरुवार दि २७ ऑगस्ट २०२६



# भौम प्रदोषनिमित्त जामखेडमध्ये पवित्र कावड यात्रा

## शेकडो महिला भगिनींचा सहभाग; नागेश्वराच्या पिंडीला जलाभिषेक करून पावसासाठी साकडे

**लोकनायक वृत्तसेवा –**

भौम प्रदोषनिमित्त जामखेड शहरात नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांच्या वतीने पवित्र कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील शनि मारुती मंदिरापासून ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या या कावड यात्रेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शेकडो महिला भगिनींनी या धार्मिक सोहळ्यात सहभागी होत खांद्यावर कावड घेऊन शिवनामाचा जयघोष व भजन करत भक्तिमय वाता-वरणात यात्रा पूर्ण केली.

भौम प्रदोषाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कावड यात्रेची सुरुवात शनि मारुती मंदिरापासून झाली. महिला भगिनींनी कावडीच्या ताम्हणामध्ये पवित्र जल घेऊन त्या कावडी खांद्यावर धारण केल्या होत्या. 'हर हर महादेव', 'श्री नागेश्वर महाराज की जय' अशा जयघोषाने तसेच शिवनामाच्या भजनाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या श्रद्धेने महिला भाविकांनी कावड यात्रा काढत ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिर गाठले.

मंदिरात पोहोचल्यानंतर भाविकांनी भगवान नागेश्वराचे दर्शन घेतले. त्यानंतर कावडीमध्ये आणलेल्या पवित्र जलाने नागेश्वराच्या पिंडीवर जलाभिषेक करण्यात आला. यावेळी भगवान नागेश्वराला साकडे घालत शहरासह संपूर्ण जामखेड तालुक्यात चांगला पाऊस पडावा, शेतकरी व



सर्वसामान्य नागरिकांवरील संकट दूर व्हावे आणि परिसरात सुख-समृद्धी नांदावी, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

पावसासाठी नागेश्वराला साकडे

सध्या जामखेड शहरासह तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी वर्ग चिंतेत असून खरीप हंगामावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत ग्रामदैवत श्री नागेश्वराच्या चरणी जलाभिषेक करून चांगल्या पावसासाठी प्रार्थना करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी म्हणाल्या, ङ्गभगवान नागेश्वराच्या पावन भूमीत आम्ही सर्व महिलांनी मिळून या पवित्र कावड यात्रेचे आयोजन केले आहे. सध्याच्या परिस्थितीत शहरासह तालुक्यात पावसाने ओढ दिली असून दुष्काळाचे सावट घोंगावत आहे. त्यामुळे ग्रामदैवत श्री नागेश्वराला अभिषेक करून चांगला पाऊस पडू दे, सर्व संकटे दू र कर, अशी मनोभावे प्रार्थना केली आहे.ङ्घ

ङ्गभगवान नागेश्वराच्या कृपेने निश्चितच चांगला पाऊस होईल आणि संपूर्ण जामखेड परिसर सुजलाम्-सुफलामब होईल, असा आम्हाला विश्वास आहे,ङ्घ असेही नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी यांनी सांगितले..

महिला शक्तीचा भक्तिमय सहभाग

या कावड यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शेकडो महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग. महिलांनी मोठ्या श्रद्धेने कावडी खांद्यावर घेतली होती. भजन, शिवनामाचा जयघोष आणि धार्मिक वातावरणामुळे यात्रा मार्गावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी यात्रेचे ठिकठिकाणी स्वागत केले.

ग्रामदैवत श्री नागेश्वर मंदिर परिसरातही यावेळी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. जलाभिषेकानंतर भाविकांनी भगवान नागेश्वराचे दर्शन घेतले. परिसरातील नागरिकांनीही या धार्मिक उपक्रमात सहभागी होत पावसासाठी प्रार्थना केली.

या पवित्र कावड यात्रेत नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी नगरसेविका नंदाताई होळकर,नागेश्वर भजनी मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब खराडे, मिलिंद ब्रम्हे, संतोष बारगजे, धर्माधिकारी मेजर,काळे महाराज, राळेभात महाराज, अमित चिंतामणी, पवन राळेभात यांच्यासह भाविक भक्त, महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भक्तिमय सोहळ्यामुळे भौम प्रदोषनिमित्त जामखेड शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# रामानंद संप्रदायाची महिला संघटन सभा मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न

## प्रत्येक महिलेने नामस्मरण, सेवा आणि समर्पण या त्रिसूत्रीने जीवन उज्वल करावे:सौ.वृंदाताई जोशी

**लोकनायक वृत्तसेवा –**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी यांच्या कृपाआशीर्वादाने व पिठाचे उत्तराधिकारी परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या दिव्य प्रेरणेने शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट २०२६ रोजी जय मल्हार लॉन्स,केडगाव, अहिल्यानगर येथे महिला संघटन सभा अतिशय भक्तिमय व उत्साही वातावरणात संपन्न झाली... रामानंद संप्रदायाच्या या सभेला अखिल भारतीय महिला सेक्रेटरी सौ.वृंदाताई जोशी यांनी प्रमुख मार्गदर्शन केले.



आपल्या मार्गदर्शनात त्यांनी संघटनात्मक कार्य हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे सांगून, संघटनेच्या माध्यमातून अध्यात्मिकतेची कास धरून कुटुंब, समाज आणि राष्ट्रहिताचे कार्य कसे करावे, याकडे महिलांचे लक्ष वेधले. प्रत्येक महिलेने नामस्मरण, सेवा आणि समर्पण या त्रिसूत्रीने जीवन उज्वल करावे, असा अध्यात्मिक संदेश त्यांनी दिला. या सभेला दक्षिण अहिल्यानगर जिल्ह्यातील पीठ समिती सदस्य,जिल्हा समिती सदस्य, संग्राम सेना, युवा सेना तसेच महिलासेना बहुसंख्येने, मोठ्या श्रद्धेने आणि उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. हरिनामाच्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. ही सभा यशस्वी होण्यासाठी जिल्हा सेवा समिती, सर्व तालुका सेवा समित्या व सेवा केंद्र सेवा समितीच्या सेवकांनी विशेष परिश्रम घेऊन अनमोल सहकार्य केले. त्याबद्दल जिल्हा सेवा समिती, दक्षिण अहिल्यानगरच्या वतीने सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात

आले तसेच उपस्थित तमात माताभगिनींचे दक्षिण आहिल्यानगर जिल्हा रामानंद संप्रदायाच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार व्यक्त करण्यात आले...

# आरोग्यवर्धिनी वेलनेस अँड फिटनेस सेंटरचा थाटात शुभारंभ

**लोकनायक वृत्तसेवा:-**

कापड व्यवसायासह अन्य बाबींची मुख्य बाजारपेठ म्हणून वडवणी शहराचा उल्लेख होतो. जुन्या काळात वडवणी शहर मुख्य बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होती .आता नव्या जुन्या उद्योग व्यवसाय सह अनेक उद्योगांची नव्याने भर पडत आहे .नुकत्याच काल बीड नगर परिषदेच्या गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर आणि ऐश्वर्या सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत आरोग्यवर्धिनी वेलनेस अँड फिटनेस सेंटरचा घाटात शुभारंभ करण्यात आला .याप्रसंगी शहरासह तालुक्यातील नामवंत मंडळींची प्रमुख उपस्थिती होती. जुना मोंढा मुख्य रस्त्यावर स्थानिक रहिवासी असलेल्या सुरेखा ताई मसुरे यांच्या संकल्पनेतून वेलनेस



सेंटरचा शुभारंभ अत्यंत उत्साहाच्या वातावरणात पार पडला या प्रसंगी वडवणी शहरातील मान्यवर मंडळींची प्रमुख उपस्थिती बाबुशेठ नहार, गुलाबराव राऊत, राठोड महाराज,माजी सभापती सुलोचना ताई आंधळे, वडवणी शहराच्या माजी नगराध्यक्ष सौ मंगल ताई मुंडे, माजी नगरसेवक सतीश बडे, नगरसेवक सचिन भैय्या सानप .संतोष डावकर, कारभारी वीर, ऋषिकेश मसुरे, रणजीत धस ,पप्पू शेठ, नांदुरकर परिवार, लक्ष्मी ताई काटकर अरुण राऊत,कांचन बाबरी मुंडे, कोमल संजय आंधळे राणी सचिन सानप , ऋतुजा मसुरे, राणी मसुरे,यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती..

# रक्ताचे नाते अनब मानवतेची साथ! जामखेडमध्ये पैगंबर जयंतीनिमित्त शिबीराला उदंड प्रतिसाद; १२२ जणांचे रक्तदान, प्रत्येक रक्तदात्याला ट्रॅक सूट भेट!

**लोकनायक वृत्तसेवा –**

मुस्लिम धर्मियांचे नबी, रसूल हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या ईद-ए-मिलाद (यौमे पैदाईश) चे औचित्य साधून सोहेल (प्रिन्स) बागवान, बागवान ग्रुप आणि सर्व मुस्लिम समाज, जामखेड यांच्या वतीने जि.प. उर्दू स्कूल, खर्डा चौक येथे भव्य रक्तदान व मोफत दंत तपासणी शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबीराला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला असून तब्बल १२२ दात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. या शिबिरास कर्जत-जामखेड विधानसभेचे आमदार मा. आ. रोहित (दादा) पवार आणि राष्ट्रवादी युवक





काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष मा. मेहबूब भाई शेख यांनी ईदच्या पवित्र पर्वास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जामखेड व परिसरातील सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील विविध मान्यवर तसेच पत्रकार बांधवांनी शिबीराला प्रत्यक्ष उपस्थित राहून भेट दिली व ईदच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

संयोजक व आरोग्य सेवा

सदर शिबीर दर्शन फाउंडेशन संचलित लाईफ लाईन ब्लड सेंटर, जामखेड आणि अल्फा दातांचा दवाखाना (डॉ. कामरान आतार - इ.ऊड. दंत व मुख रोग तज्ञ) यांच्या संयुक्त संयोजनाने पार पडले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक १२२ रक्तदात्याला आयोजकांच्या वतीने मोफत ट्रॅक सूट देऊन गौरविण्यात आले.तसेच या वेळी अल्फा दातांच्या दवाखान्याच्या वतीने नागरिकांची मोफत दंत व मुख तपासणी करून त्यांना योग्य वैद्यकीय सल्ला देण्यात आला. आयोजक सोहेल (प्रिन्स) बागवान, बागवान ग्रुप व सहकाऱ्यांनी या शिबीराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. रक्तदान करणाऱ्या सर्व दात्यांचे, शुभेच्छा देणाऱ्या सर्व मान्यवरांचे आणि सहकार्य करणाऱ्या डॉक्टर्स व आरोग्य पथकाचे आयोजकांनी मनः पूर्वक आभार मानले.

**सुरेखा ईश्वर पवार स्कुटी ॲक्टिवा ची एनओसी माऊली नगर ते आंबेडकर पुतळा मोटरसायकल जात असताना पिशवी कुठेतरी घायाळ झाली आहे नंबर MH23Bg०९८६**







## जाहीर नामा

**क्र.२०२६/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि**
**-कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अंबाजोगाई**
**दि.२५.०८.२०२६**

**जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत**

सर्व जनतेस वालुका अंबाजोगाई यांना जाहिर केले जाते की, अर्जदार बरांत संतराम विलगर रा. पिंपळटक्का ता. वडवणी निबीड येथील रहिवासी असुन यांचा नातु नामे ऋतुराज शहाजी हाके यांचा जन्म दिनांक २६.०५.२०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मामीण रुग्णालय अंजोगाई ता अबाजोगाई जि.चीड येथे झाला अर्जदारानी जन्म कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता अर्जदार यांच कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळिवण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल

**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार अंबाजोगाई**

# अंबाजोगाईत जबरी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्यांना ठोकल्या बेड्या

## मोटारसायकलसह ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**लोकनायक वृत्तसेवा –**

अंबाजोगाई शहर परिसरात जबरी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा, बीड व अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करून दोन सराईत चोरट्यांना जेरबंद केले. आरोपींकडून चोरीसाठी वापरलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे गुन्हा क्रमांक २८६/२०२६, कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दाखल गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड व पो-लीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण यांच्याकडून सुरू होता. दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीकडून घटनेची माहिती घेतली. आरोपींचा अंबाजोगाई शहर परिसरात जबरी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना



स्थानिक गुन्हे शाखा, बीड व अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करून दोन सराईत चोरट्यांना जेरबंद केले. आरोपींकडून चोरीसाठी वापरलेली स्प्लेंडर प्लस मोटारसायकल व रोख रक्कम असा एकूण ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे गुन्हा क्रमांक २८६/२०२६, कलम ३०९(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दाखल गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड व पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण यांच्याकडून सुरू होता. दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन फिर्यादीकडून घटनेची माहिती घेतली. आरोपींचा

लोकनायक

गुरुवार दि २७ ऑगस्ट २०२६

४

# समर्थ राजयोगचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर..!

## दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विनोद खडके, सौ.जनाबाई जाधव, रवींद्र आरबाड, अशोक तळपती, रुपेश भोजापुरे, अनिता चौधरी, उद्धव कदम, शरद तळेकर आणि अशोक चव्हाण सर पुरस्काराचे ठरले मानकरी..!!


खडके विनोद शंकरराव, कलाशिक्षक


श्रीमती– सौ.जाधव जनाबाई कोंडीबा,पद– मुख्याध्यापिका


श्री रविंद्र शंकरराव आरबाड, पद– विशेष शिक्षक


श्री अशोक महालिंग थळपती, पद– मुख्याध्यापक, माजलगाव


रुपेश नथुजी भोजापुर पद–विशेष शिक्षक


श्रीमती अनिता श्रीरंगराव चौधरी
पद- प्र.मुख्याध्यापिका


उध्दव रामराव कदम, विशेष शिक्षक अंबाजोगाई


अशोक अंकुशराव चव्हाण (पद–मुख्याध्यापक)

**लोकनायक वृत्तसेवा –** दैनिक समर्थ राजयोगच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी दिव्यांगांच्या विशेष शाळेतील आदर्श शिक्षकांना सन्मानित करण्यात येणार आहे. हा सन्मान त्यांच्या हातून होत असलेल्या दिव्यांगांच्या सेवेची दखल घेऊन हेलन केलर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक प्रेरणा पुरस्कार २०२६ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. दैनिक समर्थ राजयोग आपल्या वर्धापन दिनानिमित्त मागील सहा वर्षापासून शिक्षक दिनाचे औचित्य साधत दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्षित, वंचित असलेल्या घटकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करत आहे. यावर्षी बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळेतील संस्था चालक, आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या मान्यवरांना हेलन केलर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक प्रेरणा पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत सर्वश्री, परिवर्तन सेवाभावी संस्था नेकनूर अंतर्गत अस्थिव्यंग निवासी विद्यालय नेकनुरचे कलाशिक्षक श्री विनोद शंकरराव खडके, जनार्दन शिक्षण प्रसारक मंडळ येळंबघाट अंतर्गत मतिमंद निवासी विद्यालय उमरी तालुका केज येथील मुख्याध्यापिका सौ. जनाबाई कोंडीबा जाधव, रेणुका माता **पान २ वर**

# पत्रकार मारहाण प्रकरणात मोठी कारवाई

## पत्रकार एकजुटीचा विजय; आरोपींवर इछड कलम १११ अंतर्गत कठोर कारवाई

**लोकनायक वृत्तसेवा –** पत्रकार मारहाण प्रकरणात तोफखाना पोलिसांनी मोठी आणि परिणामकारक कारवाई करत आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १११ लागू केले आहे. या कारवाईमुळे पत्रकार संघटना आणि पत्रकार बांधवांच्या एकजुटीला मोठे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.या प्रकरणात सोनू उर्फ हेमंत दत्तात्रय कोहक, विकी उर्फ विकास बाळासाहेब ढवण, महेश उर्फ पप्पू दशरथ मते, प्रशांत शिवाजी निक्रड आणि अमोल रामदास साठे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.तप–ासादरम्यान सोनू उर्फ हेमंत दत्तात्रय कोहक, महेश उर्फ पप्पू दशरथ मते आणि प्रशांत शिवाजी निक्रड या आरोपींवर तोफखाना व पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खुनाचा प्रयत्न, फसवणूक, जबरी मारहाण यांसारख्या गंभीर स्वरूपाचे तब्बल १३ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.सदर आरोपींवर यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यांच्या वर्तनात सुधारणा न होता ते सातत्याने गंभीर स्वरूपाचे गुन्हे करत असल्याचे तपासात समोर आले. त्यामुळे या गुन्हेगारी टोळीवर प्रभावी आणि कठोर कारवाई करण्यासाठी तोफखाना पोलीस ठाण्याने भारतीय न्याय संहितेच्या कलम १११ अंतर्गत वाढीव कारवाईचा प्रस्ताव अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्याकडे सादर केला होता.आरोपींच्या गुन्हेगारी टोळीचा बिमोड करून परिसरातील दहशत संपुष्टात आणण्यासाठी अपर पोलीस अधीक्षकांनी प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर या गुन्ह्यात इछड कलम १११ लागू करण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, पोलीस कर्मचारी हेमंत झिने आणि तोफखाना **पान २ वर**

# वाळू माफियाचा तहसीलदारांसह महसूल पथकावर हल्ला पाच हायवा जप्त



**लोकनायक वृत्तसेवा –** गोंदी पोलीस स्टेशन पासून दोन किलोमीटर अंतरावर गोंदी येथे सिद्धेश्वर गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपशावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदारांसह महसूल पथकाला वाळू माफियांकडून मारहाण केल्याची धक्कादायक गंभीर प्रकार समोर आला आहे.

बुधवारी सकाळी ७ च्या दरम्यान अंबड चे तहसीलदार सोमेश मोहिते हे अवैध वाळू उपसा होत असल्याच्या माहितीवरून महसूल पथकासह कारवाईसाठी घटनास्थळी दाखल झाले होते. मात्र, कारवाई सुरू असतानाच काही वाळू वाहतूकदारांनी महसूल पथकाशी हुज्जत घालत तहसीलदार आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केली या घटनेत तहसीलदार सोमेश मोहिते आणि एक कोतवाल यांना धक्का बुक्की व मारहाण **पान २ वर**

# आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून रुग्णांना मोठा दिलासा; वैद्यकीय उपचारांसाठी १ लाख ९९ हजारांची मदत व सवलत

**लोकनायक वृत्तसेवा –** लोकनेते आ. सुरेश अण्णा धस यांच्या माध्यमातून मतदारसंघातील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी सातत्याने मदत मिळवून दिली जात आहे. त्याच अनुषंगाने खडकत (ता. आष्टी) येथील अडीच वर्षांची चिमुकली ओजस्वी किशोर पवार हिच्या पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमधील उपचारासाठी धर्मादाय योजनेअंतर्गत ६९ हजार रुपयांची बिलात सवलत मिळवून देण्यात आली आहे.ओजस्वी हिच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. डिस्चार्जच्या वेळी तिचे एकूण बिल १ लाख ३८ हजार रुपये झाले होते. धर्मादाय योजनेअंतर्गत त्यापैकी ५० टक्के म्हणजेच ६९ हजार रुपयांची रक्कम माफ करण्यात आली. ही सवलत मिळवून देण्यासाठी रुग्णसेवक अमर वाळके यांनी आ. सुरेश अण्णा धस यांच्या कार्यालयाच्या माध्यमातून पाठपुरावा केला.दरम्यान, घाटा पिंपरी (ता. आष्टी) येथील वेदांत आमटे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून ८० हजार रुपये, तर तवलवाडी (ता. आष्टी) येथील दत्ता आठरे यांच्या उपचारांसाठी ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.या तिन्ही प्रकरणांमध्ये मिळून रुग्णांना १ लाख ९९ हजार रुपयांची आर्थिक मदत व वैद्यकीय बिलात सवलत मिळाली आहे. आर्थिक अडचणींच्या काळात उपचारासाठी मिळालेल्या या मदतीमुळे संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणींमुळे उपचारांमध्ये अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी आ. सुरेश अण्णा धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधी, धर्मादाय योजना तसेच विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा **पान २ वर**

# पाटबंधा–या विभागाच्या जायकवाड्या शासनाच्या रडारवर वास्तव्यास आसलेल्या नागरिकांनी आता रहायचे कुठे?

## लोकप्रतिनिधींनी शासन स्तरावर प्रयत्न करत या बाबत पुढे येऊन वास्तव्यास आसलेल्या लोकांच्या पुनर्गठनांची व्यवस्था करणे जरजेचे!




**लोकनायक वृत्तसेवा –** महाराष्ट्रात शासन स्तरावर अस्तित्वात आसलेल्या पाटबंधारे विभागाने पाटबंधा–याच्या कामाचे देखरेख व नियोजन हेतु कार्यरत अधिकारी व कर्मचा–यांच्या राहण्यासाठी राज्यभरात ठिक ठिकाणी जायकवाडी वसाहतीचा मोठ्या प्रमाणात ऊगम निर्माण केला होता. त्या त्या ठिकाणी पाटबंधा–याचे कामकाज पहाणारे अधिकारी व कर्मचारी वास्तव्यास होते. परंतु पाटबंधा–याचे काम पूर्णत्वास गेल्यावर आणेक अधिकारी, व कर्मचारी काही रिटायर्ड झाली तर काहींची मुले त्या त्या ठिकाणी देखरेख पुरती कन्वट झाली. वास्तविक पहाता जो स्टाफ तुरळक प्रमाणात राज्यभरातील जायकवाडी वसाहतीत रहदारीस होता. ते सर्व आता वेळोवेळीच कामे आसल्याने जायकवाडी वसाहत सोडुन शहरी भागात वास्तव्यास जाऊन पाटबंधा–याचे कामकाज **पान २ वर**



**लोकनायक वृत्तसेवा –बहिण भावाचे अतूट पवित्रप्रेम नाते दर्शवणारा रक्षाबंधनाचा सण नुकताच साजरा होणार असून , हिरालाल चौक येथील गुंडू फुलारी राखी सेंटर चेअशी दुकाने सजवलेली दिसून येत आहे. बहिणी आपल्या भावासाठी राखी खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहे.**

# बाभळगाव च्या उपसरपंचा संशयास्पद मृत्यू ; अपघात की घातपात.?





**लोकनायक वृत्तसेवा –** तालुक्यातील बाभळगाव येथील विद्यमान उपसरपंच वैजनाथ विठ्ठलराव लाटे (३५वर्षे अंदाजे) यांचा गंभीर जखमी अवस्थेत असलेला मृत देह २६ऑगस्ट रोजी च्या पहाटे ५वा.च्या सुमारास धारुर तालुक्यातील भोपा ते माजल–गाव तालुक्यातील बाभळगाव कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर आढळून आला तर त्यांच्या मोटार सायकलचा पुढील भाग नष्ट झाल्याने अपघात की घातपात असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.या घटने प्रकरणी समजलेल्या माहितीनुसार मयत उपसरपंच वैजनाथ लाटे हे २५ऑगस्ट रोजी च्या मध्यरात्री नंतरच्या दोन वाजेपर्यंत त्यांच्या बाभळगाव येथील घरात झोपेत असतानाच्या त्यांना कुणी कितीही मोबाईल वर संवाद साधला आणि ते एकटेच मोटार सायकलवरून **पान २ वर**

# दुःखद वार्ता



**लोकनायक वृत्तसेवा –** श्री नवनाथ भाऊसाहेब नागरगोजे ( सहसंचालक नगररचना छत्रपती संभाजी नगर विभाग) यांच्या मातोश्री श्रीमती मंकरणाबाई भाऊसाहेब नागरगोजे राहणार सावरगाव ( सोनी) तालुका पाटोदा जिल्हा बीड यांचे आज दिनांक २६.८.२०२६ रोजी सायंकाळी ६:५० वाजता वृद्धापकाळाने निधन झालेले आहे त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम उद्या गुरुवार दिनांक २७.८.२०२६ रोजी पाटोदा येथील **पान २ वर**

## सुचना

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोणतीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दूल लोकनायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com